वि.दि.दावा.क्र. २९/२०२३
दुर्गाबाई वि. नारद
निशाणी क्र. ९१

वादीतर्फे साक्षीदार क्र.२ करण श्रीराम बिरोह-
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. अंबरवेले यांच्यातर्फे सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी, माझ्या जन्माचा दाखला, माझ्या आईचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र, दावा मिळकतीचे सातबारा उतारे आणि उप विभागीय अधिकारी यांच्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. सदर दस्तांना अनुक्रमे <u>नि.क्र. ९४ ते ९८</u> देण्यात येत आहे. प्रतिवादी यांच्या वकीलांनी आक्षेप नोंदविला की साक्षीदाराच्या आईच्या अपगत्वाच्या प्रमाणपत्रास आणि साक्षीदाराच्या जन्म प्रमाणपत्रास केवळ ओळखीसाठी निशानी देण्यात यावी आणि त्याचा मजकुर मान्य असल्याबाबत आक्षेप आहे. वादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की सदर कागदपत्रे सरकारी कार्यालयातुन प्राप्त झाले असल्यामुळे ते पुर्णपणे पुराव्याकामी ग्राहय आहेत. सदर दोन्ही कागदपत्रे पुराव्याकामी ग्राहय आहेत किंवा नाही, त्याबाबत अंतिम निर्णय हा अंतिम युक्तीवादीच्या वेळेस ठरविण्यात येईल.
सरतपास पुर्ण.

<u>साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ करीता त्यांचे विधिज्ञ श्री. केला यांद्वारे</u>-

३. माझ्या वडीलांचे नाव श्रीराम आहे. माझे वडील साटक येथे राहत होते. माझ्या आईचे नाव दुर्गाबाई आहे. दुर्गाबाई ही श्रीराम यांची दुसरी पत्नी आहे. दुर्गाबाई हिचे लग्न श्रीरामसोबत कधी झाले हे मी सांगु शकत नाही. श्रीराम यांच्या पहिल्या पत्नीचे नाव लिलाबाई असे आहे. हे म्हणणे खरे आहे की माझी आई, लग्नानंतर श्रीराम यांच्यासोबत साटक येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की माझा जन्म साटक येथे झाला. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की माझा जन्म बोरखेडी येथे झाला. हे म्हणणे खरे आहे की माझ्या जन्मापासुन मी माझ्या आईसोबत राहत आहे. रविंद्र उर्फ रमेश हा माझा सावत्र भाउ आहे. रविंद्र हा माझ्यासोबत राहतो. हे म्हणणे खरे आहे की जेथे जेथे माझी आई जात होती त्यात्या ठिकाणी मी आईसोबत जात होतो. माझे शिक्षण बारावी पर्यंत आहे. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस दावा दाखल करण्यात आला, त्यावेळेस मी माझ्या आईसोबत वकीलांकडे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की ज्याज्या वेळेस आई कोर्टामध्ये येत होती त्यात्या वेळी मी तिच्या सोबत

कोर्टामध्ये येत होतो. पुर्वी दावा हा नागपुर येथील न्यायालयात होता. दावा हा जिल्हा न्यायालयात चौथा किंवा पाचव्या माळ्यावर होते. पुर्वीपासुन माझे वकील रविंद्र अंबरवेले हेच आहेत. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस आई किंवा वकील येत नव्हते त्यावेळेस मी वकीलांना फोनद्वारे सांगत होतो. हे म्हणणे खरे आहे की केस दाखल केल्यापासुन ते आजतागायत माझी माझ्या वकीलांसोबत केसबददल, केसमधील स्टेपसबाबत, प्रगतीबाबत बोलणे चालु आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की वडील मयत झाल्यानंतर आईही घरातील मोठी कर्ता व्यक्ती होती. हे म्हणणे खरे आहे की माझी आई, माझा आणि रविंद्रचा सांभाळ करत होती. हे म्हणणे खरे आहे की माझी आई ही कालांतराने ब्राम्हणी येथे, साटक सोडुन गेली होती. हे म्हणणे खरे आहे की माझी आई आमचा दोघांचा सांभाळ करण्यासाठी शेतीवर अवलंबुन होती. हे म्हणणे खरे नाही की आमच्या दोघांच्या शिक्षणासाठी आणि उदरनिर्वाहासाठी माझ्या आईने शेती विकायला काढली होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आईने प्रतिवादी क्र. १ सोबत शेत विक्रीचा करारनामा केला होता. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की पैशाची गरज होती म्हणुन केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की सदर शेती विकुन, माझ्या आईच्या नावाने शेती विकत घेण्यात आली होती. एस.डी.ओ.च्या आदेशाविरुद्ध कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आईने सांगितल्यावरुन मी फसवणुक झाल्याचे म्हणत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ आणि २ ने जमिनीचा संपुर्ण मोबदला दिला असता देखिल, प्रस्तुतची जमिन हडप करण्याकामी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.३ व ४ करीता -

प्रतिवादी क्र.३ व ४ गैरहजर. सबब, उलटतपास नाही.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.५ करीता त्यांचे विधिज्ञ श्री. देवळे यांद्वारे-

प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर.

सबब, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

I.O.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.02.04 11:38:49 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक ३.०२.२०२६.
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)